मला जाणलेली सात सत्ये :

एक, आपण आपलेच असतो कायमचे,
नसतो दुसऱ्यांचे.

दोन, दुसरे अधून मधून आपले होतात,
होऊनही निघून जातात.

तीन, जे निघून जातात ते भेटल्यावर हसतात,
पुन्हा भेटू या म्हणतात.

चार, जे नव्याने भेटतात ते जुन्यांसारखेच असतात
भेटून परत नाहीसे होतात.

पाच, जे जवळचे कायमचे, कायमचेदृष्टि निघून जातात,
सृष्टी-दृष्टीतून नाहिसे होतात.

सहा, वृद्धत्वात जे जवळचे होतात, ते जवळ राहतात,
‘थोडाच काळ’, हे जाणून असतात.

सात, येता-जाताना  आपले आपणच असतो,
उरलेले दुसरे पण, वेळचे आधार असतात.

५.१.२०१९